

# मराठी लेख - १३

**आसावरी सुर्वे, शाळा :** विद्या मंदिर, दहिसर

### घटकचाचणी परीक्षा १ सराव प्रश्नपत्रिका

**वेळ : १ तास** **गुण ३०**

**प्र. १ला क) खालीलपैकी कोणत्याही एका प्रश्नाचे उत्तर सुमारे ७० ते ८० शब्दांत लिहा.** (५)

१) अधिकाऱ्यांच्या अंगी कोणते गुण असावेत असे 'आज्ञापत्र' सांगते?

२) आधारीचेंया परीसाचा दृष्टान्त कोणती शिकवण व्यक्त करतो?

**ख) कोणत्याही एका प्रश्नाचे उत्तर सुमारे ३० ते ४० शब्दांत लिहा.** (३)

१) शेतकऱ्याच्या पिढीजात पोशाखाची व आहाराची माहिती द्या.

२) कोल्हापूर येथे शिक्षणासंबंधी प्रतिकूलता दिसल्याने गोपाळरावांनी कोणता निर्णय घेतला?

**प्र. २रा क) कोणत्याही एका प्रश्नाचे उत्तर सुमारे ७० ते ८० शब्दांत लिहा.** (४)

१) संत रामदास यांनी वर्णन केलेल्या निसर्गदृश्याचे वैशिष्ट्य तुमच्या शब्दांत लिहा.

२) संत तुकाराम यांच्या मते गृहस्थाश्रमातील माणसाने कसे वागावे?

**ख) कोणत्याही एका प्रश्नाचे सुमारे ३० ते ४० शब्दांत उत्तर लिहा.** (३)

१) संत एकनाथांचा बचडा कोणाशी वादविवाद करतो?

२) ऊस आणि पाणी या दृष्टान्त रचनेतून कोणता भाव प्रकट होतो?

**प्र. ३रा क) खालील प्रश्नाचे उत्तर एका वाक्यात लिहा.** (१)

१) सहा ऋतू कोणाला समान आहेत?

**ख) पाठ्यपुस्तकाच्या आधारे पुढील विधान पूर्ण करा.** (१)

१) अज्ञानाने गांजलेल्या शेतकऱ्यांना ... दान द्यावे.

**प्र. ४था क) कोणत्याही एका अवतरणाचे संदर्भासह स्पष्टीकरण करा.** (४)

१) 'सिपाही हो अगर पावखलक हे, बहुत यादी धरून वर्तणूक करणे.'

२) 'झेंगट घेऊनी हातीं दवंडी पिटीन तिही लोकीं'

**प्र. ५वा) कोणत्याही एका प्रश्नाचे उत्तर सुमारे ५० ते ६० शब्दांत लिहा.** (३)

१) आई आणि बाळू एकमेकांचे सवंगडी कसे? तुमच्या शब्दांत सांगा.

२) आईच्या सहवासात बाळूने कोणते कोणते खेळ खेळले?

**प्र. ६वा क) खालीलपैकी कोणत्याही एका अलंकाराचे उदाहरण देऊन लक्षणे सांगा.** (२)

१) दृष्टान्त २) अनन्वय

**ख) शब्दसिद्धीच्या कोणत्या प्रकारात येतात ते लिहा. (कोणतेही चार)** (२)

१) संतोष २) जुमलेवार ३) अनाम ४) झळझळ ५) बेलगाम ६) रोषणाई

**ग) कोणत्याही एका वाक्प्रचाराचा अर्थ सांगून वाक्यात उपयोग करा.** (२)

१) कानउघाडणी करणे २) छल करणे ३) भारी लागणे

### घटक चाचणी परीक्षा -१ नमुना उत्तरपत्रिका

**प्र. १ ला- क)** i) 'छत्रपती श्री शिवाजी महाराजांचे एक आज्ञापत्र' या ऐतिहासिक पत्रातून अधिकारी, हवालदार व कारकून इत्यादी जबाबदार व्यक्तींना सूचना दिल्या आहेत. छत्रपतींना अधिकाऱ्यांनी कर्तव्यदक्ष राहावे असे अभिप्रेत आहे.

प्रजेशी होणाऱ्या व्यवहारात निःस्पृहता हवी. शेतकऱ्यांना लुबाडू नये. आर्थिक व्यवहार करणाऱ्या जुमलेदार किंवा कारकून यांच्या ठायी प्रामाणिकपणा असावा. खजिन्यातून तरतूद असलेली रक्कम सांभाळून वापरावी. राहुट्यातून स्वयंपाकासाठी किंवा तंबाखू जाळण्यासाठी अग्नी प्रज्वलित करतात. हवालदारांनी अशावेळी गस्त घालणे अपेक्षित आहे. अधिकारी अशा वेळी जागरूक असणे आवश्यक आहे.

मऱ्हाटेशाही सुरक्षित आहे. प्रजेला बिनधोक वागता येत आहे, असे निर्मळ वातावरण प्रस्थापित करण्यासाठी अधिकारी काटेकोरपणे वागणारे, प्रजेच्या देखभालीसाठी परिश्रम घेणारे, प्रजेला प्रेमाने वागविणारे, न्याय्य हक्क मिळवून देणारे, सावधगिरी बाळगून प्रजेला शत्रूपासून सुरक्षित राखणारे असे हवेत.

छत्रपतींना सक्षम अधिकारी असावेत अशी अपेक्षा आहे.

**(ख)** २) कोल्हापूर येथे शिक्षणासंबंधी प्रतिकूलता दिसल्याने गोपाळराव यांनी धाडसी निर्णय घेतला. भारतीयांना स्त्री शिक्षणाविषयी तळमळ नाही किंवा ते विरोधच करतात. हे वातावरण कोल्हापुरातही आहे. येथील मिशनऱ्यांकडून इंग्रजी शिकण्याची सोय झाली. मिशनऱ्यांच्या घरी आनंदीबाई यांना अमेरिकेबद्दल बरीच माहिती मिळाली. याचवेळी आनंदीबाईंनी पुढील उच्च शिक्षणासाठी अमेरिकेत जावे, हा विचार पक्का झाला. या विचाराने गोपाळरावांना अमेरिकेत जाण्याचे वेड लागले.

**प्र. २ रा- क)** ही कविता निसर्गाच्या रौद्र स्वरूपाचे दर्शन घडविते. समर्पक संस्कृतमय शब्दांतून ती परिणाम साधते. येथे सृष्टीच्या भव्य-दिव्यतेचा साक्षात्कार प्रत्ययास येतो. झंझावाती पाऊस धो धो कोसळत होता. पर्वत शिखरावरील उगम पावलेली नदी प्रचंड वेगाने खाली धाव घेत होती. उन्मत्त समुद्राने गर्जना करावी तशी मेघगर्जना होत होती. दरीतून वाहणारा वादळी वारा भोवरे होऊन घोंघावत होता. पाण्याचे असंख्य तुषार उसळत होते. धुलीकणांना साथीला घेऊन धुके तयार करीत होते. रात्रीचा गडद अंधार वातावरणात भीषण छाया पसरवीत होता. रानावनातील श्वापदांच्या भयानक आवाजांनी आसमंत व्यापून गेले होते. चहूकडून ध्वनीकल्लोळ उठला होता.

काव्यगुणास पोषक अशी शब्दरचना साधून झंझावाती पावसाचे भीषण रूप उभे केले आहे. समर्थ रामदासांची बलशाली काव्यप्रतिभा ओजस्वी रूप घेते. 'धबाबां लोटल्या धारा धबाबां तोय आदळे' सारख्या काव्य ओळीत शब्दांची अचूक मांडणी केली आहे. चित्रमय वर्णनशैली हे या काव्याचे वैशिष्ट्य आहे. शब्दसामर्थ्याची रमणीयता काय वर्णावी?

**(ख)** 'असा कसा देवाचा देव' या अभंगात संत एकनाथ श्रीकृष्णाच्या बाललीलांचे वर्णन करतात- 'नाथांचा बचडा' नवनीताचा सडा घालून वाळवंटी असलेल्या भक्तगणात रममाण होतो. तेथे जमलेल्या साधुसंतासमोर कीर्तन करतो. नामसंकीर्तनात रमलेल्या भक्तांबरोबर वादविवाद करतो. वारकरी संप्रदायामध्ये देवदर्शनाला आलेले भाविक हे नदीच्या वाळवंटामध्ये भजन, कीर्तनात रमलेले असतात. तेथे परमार्थावर चर्चा होते. वादविवाद होतो. कृष्णमय झालेल्या संत एकनाथांना संपूर्ण जीवनव्यवहारात देव दिसतो.

**प्र. ३ रा- क)** i) सहा ऋतू आकाशाला समान आहेत.

**ख)** i) अज्ञानाने गांजलेल्या शेतकऱ्यांना **विद्या**दान द्यावे.

**प्रश्न. ४ था - क) स्पष्टीकरण-** संत नामदेव हे विठ्ठलाचे परमभक्त. या अपार भक्तीनेच ते विठ्ठलमय झाले आहेत. या भक्तीनेच त्यांना अधिकारही प्राप्त झाला आहे. परमेश्वराशी लाडीवाळपणे भांडण करताना ते म्हणतात, देवा, तुला 'पतितपावन' का म्हटले? तू पतितपावन नाहीस, हे साऱ्या जगाला मी सांगीन, दवंडी पिटीन, हाती झेंगट घेईन. (झेंगट- वाद्य) देवा, तू घात करणारा आहेस, असे सर्वांना सांगेन.

**भाषाविशेष-** भक्ताचे भगवंताशी असलेले लटके भांडण स्पष्ट करणारी ही रम्य काव्यपंक्ती आहे.

**प्र. ५ वा -** कथाकार कुसुमावती देशपांडे यांच्या 'दीपमाळ' या संग्रहातील 'सवंगडी' ही कथा मनाला स्पर्श करणारी आहे.

आई आणि बाळू यांच्या निरलस प्रेमाचे चित्रण या कथेत केले आहे. आई आपल्या मुलाशी एखाद्या सवंगड्याप्रमाणे खेळते. त्याच्या भाववृत्ती समजून घेते. त्याच्या खेळात समरसून जाते. बोबड्या बोलाने त्याला रिझविते. गोड शब्दाने त्याच्याकडून कामेही करून घेते. कातरकाम चालू असताना बाळूची बडबडही चालू असते. तरीही आई कंटाळत नाही. ती बाळूच्या वयाची होऊन त्याच्या विचारांशी जुळते घेते. त्याच्या कातरकामाचे कौतुक करते. आई त्याला कठोर शब्दात धाक देत नाही. एका 'सवंगडी' मित्राशी जुळवून घेते.

**प्र. ६ वा- (क) अनन्वय- लक्षण-** जेव्हा उपमेयास त्याचीच उपमा दिली जाते तेव्हा अनन्वय हा अलंकार होतो.

उपमेयाची दुसऱ्या कशाशीही म्हणजे कोणत्याही उपमानाशी तुलना होऊ शकत नसल्यामुळे यास अनन्वय म्हणतात. उपमेय अनुपमेय आहे, असे सांगण्याचा हेतू असतो.

उदाहरण- झाले बहु, होतिल बहु, आहेतहि बहु, परंतु यासम हा.

(महाभारत, विराट पर्व- मोरोपंत.)

**प्र. ६ वा- ख)** २) जुमलेवार- प्रत्ययघटित ३) अनाम- उपसर्गघटित.

४) झळझळ- पूर्णाभ्यस्त ६) रोषणाई- प्रत्ययघटित.

**(ग)** i) कानउघाडणी करणे- कडक शब्दात सल्ला देणे

महात्मा फुले यांनी इंग्रज सरकारची कानउघाडणी केली.

**उद्याचा विषय : भूगोल**

**संपर्क :** yashasvibhava2008@gmail.com




यंदाच्या पावसाळ्यात तुमच्या मुलाला

**असुरक्षित** ठेवू नका.

पावसाळ्यामध्ये पाण्यावाटे फैलावणाऱ्या आजारांची जोखीम खूपच वाढते. ॲक्वागार्ड टोटल द्वारा तुमच्या कुटुंबीयांना जॉंडिस, टायफॉइड आणि डायरिया सारख्या आजारांपासून संपूर्ण सुरक्षा मिळत असल्याची खात्री करून घ्या. म्हणूनच 40 लाख माता केवळ ॲक्वागार्ड टोटल वॉटर प्युरीफीकेशन वर विश्वास ठेवतात.

फ्री होम डेमोसाठी 56006 ला "AG" SMS* करा किंवा फोन: 098210 48777, 3988 3333



Aquaguard Total™

Total Health. Total Water Purification.

*स्पेशल SMS रेट्स लागू.

TRITON/08/EFL/067